**मौजा कोरची येथील प्रस्तावित ०५ लोह खनिज क्लस्टर प्रकल्पांनी मौजा झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथील लोह खनिज उत्खनन करण्याकरिता स. क्रं. ८२ मधील एकूण क्षेत्र ४६.३७ हे.आर. क्षेत्रामध्ये:- १) श्री. आर.एम. राजूरकर यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (८.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/१), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, २) मे. अनुज माईन्स मिनरल्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/२), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ३) श्री. निर्मल चंद जैन यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१०.३७ हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/३), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ४) श्री. अनोज कुमार अगरवाला यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/४), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ५) श्री. मनोज कुमार अजितसरिया यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (४.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/५), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथे एकूण क्लस्टर क्षेत्र ४६.३७ हे.आर.) लोह खनिज उत्खनन प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १०/१०/२०२३ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली |

**प्रस्तावना:-**

मौजा कोरची येथील प्रस्तावित ०५ लोह खनिज क्लस्टर प्रकल्पांनी मौजा झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथील लोह खनिज उत्खनन करण्याकरिता स. क्रं. ८२ मधील एकूण क्षेत्र ४६.३७ हे.आर. क्षेत्रामध्ये:- १) श्री. आर.एम. राजूरकर यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (८.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/१), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, २) मे. अनुज माईन्स मिनरल्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/२), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ३) श्री. निर्मल चंद जैन यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१०.३७ हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/३), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ४) श्री. अनोज कुमार अगरवाला यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/४), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ५) श्री. मनोज कुमार अजितसरिया यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (४.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/५), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथे एकूण क्लस्टर क्षेत्र ४६.३७ हे.आर.) लोह खनिज उत्खनन प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात

मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण व हवामान बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी टीओआर दिनांक २२/०२/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग 'ब' खनिज उत्खनन (कोळसा व्यतिरिक्त) श्रेणीमध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक मौजा कोरची येथील प्रस्तावित ०५ लोह खनिज क्लस्टर प्रकल्पांनी मौजा झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथील लोह खनिज उत्खनन करण्याकरिता स. क्रं. ८२ मधील एकूण क्षेत्र ४६.३७ हे.आर. क्षेत्रामध्ये:- १) श्री. आर.एम. राजूरकर यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (८.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/१), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, २) मे. अनुज माईन्स मिनरल्स ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/२), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ३) श्री. निर्मल चंद जैन यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१०.३७ हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/३), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ४) श्री. अनोज कुमार अगरवाला यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (१२.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/४), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली, ५) श्री. मनोज कुमार अजितसरिया यांची प्रस्तावित झेंडेपार लोह खनिज खाण प्रकल्प (४.० हेक्टर खाण क्षेत्र), खसरा क्रं. ८२ भाग (८२/५), झेंडेपार, ता. कोरची, जि. गडचिरोली येथे एकूण क्लस्टर क्षेत्र ४६.३७ हे.आर.) लोह खनिज उत्खनन प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १०/०३/२०२३ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी गडचिरोली, महाराष्ट्र राज्य यांनी शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) व ऑनलाईन पध्दतीने पर्यावरणविषयक जनसुनावणी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द हितवाद, नागपूर एडिशन यात इंग्रजीत दिनांक ०६/०९/२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली

होती. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांना १४२ लेखी निवेदने प्राप्त झालेली आहेत.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
६) जिल्हा परिषद, गडचिरोली.
७) जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.
८) उप-विभागीय कार्यालय, कुरखेडा, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली.
९) नगर पंचायत कार्यालय कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१०) तहसिल कार्यालय, कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली.
११) पंचायत समिती कार्यालय, कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१२) ग्राम पंचायत कार्यालय, नांदळी, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१३) ग्राम पंचायत कार्यालय, मसेली, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१४) ग्राम पंचायत कार्यालय, नवरगांव, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१५) ग्राम पंचायत कार्यालय, कोटरा, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१६) ग्राम पंचायत कार्यालय, बोटेकसा, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१७) ग्राम पंचायत कार्यालय, बिहटेकला, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१८) ग्राम पंचायत कार्यालय, बेडगाव, ता. कोरची, जि. गडचिरोली.
१९) ग्राम पंचायत कार्यालय, जांभळी, ता. कोरची, जि. गडचिरोली.
२०) ग्राम पंचायत कार्यालय, आस्वल हुडकी, ता. कोरची, जि. गडचिरोली.
२१) ग्राम पंचायत कार्यालय, बेतकाठी, ता. कोरची, जि. गडचिरोली.
२२) ग्राम पंचायत कार्यालय, नवेझरी, ता. कोरची, जि. गडचिरोली.

२३) ग्राम पंचायत कार्यालय, मुरकुटी, ता. कोरची, जि. गडचिरोली.
२४) ग्राम पंचायत कार्यालय, बेलारगोंदी, ता. कोरची, जि. गडचिरोली.

वरिल अनुक्रमांक ०४ ते २४ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-६४/२०२३ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२३०९१३-एफटीएस-०३१९ दिनांक १३/०९/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १४२ निवेदने प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरूवातीस श्री उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री धनाजी पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की जे काही लेखी निवेदने/आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, ते शासनास पाठविण्यात येतील. त्याचप्रमाणे उपस्थितांपैकी कोणाला जर फक्त लेखी निवेदन/आक्षेप नोंदवायचा असेल, तर ते म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस हस्तांतरित करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल. त्याचे लेखी उत्तर प्रकल्प प्रवर्तकांना संबंधित व्यक्तीस पाठविण्याची सूचना करण्यात आलेली आहे

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

१) **<u>डॉ. श्री. नामदेव उसेंडी, माजी आमदार, चिमूर गडचिरोली विधानसभा क्षेत्र, जिल्हा गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्हाला आनंद आहे की झेंडेपार येथे येणाऱ्या प्रकल्पांबाबत जाहीर जनसुनावणी येथे आयोजित करण्यात आली आहे. मला असे वाटते की, सदर जनसुनावणी पर्यावरण व वने मंत्रालय यांच्या अटी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | व शर्तीचे पालन करूनच येथे आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये काही सर्वसाधारण अटी व काही विशिष्ट अटी आहेत. मी येथे काही सर्वसाधारण अटींवर आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यापूर्वी मी येथील सर्वसामान्य जनतेशी संवाद साधू इच्छितो. सदर क्षेत्राचे सीमांकन कोण केले याबाबत मला माहिती देण्यात यावी. आपण माझ्या प्रश्नांची नोंद घ्यावी व माझ्या प्रश्नांचे लगेच उत्तर किंवा माझ्या प्रश्नांची नोंद घ्यावी व नंतर एकत्रितपणे माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावी. तर हे सीमांकनाची प्रक्रिया ही महसूल विभागाच्या किंवा वन विभागाच्या अधिकाऱ्यांद्वारे संयुक्तपणे करण्यात यायला हवी होती व सदर सीमांकन हे प्रकल्प क्षेत्राच्या १.५ किमीच्या परिसरात करायला हवी होती. तर या सर्व सामान्य अटी आहेत. नैसर्गिक, मानव निर्मित व पुरातन क्षेत्रालगत कोणत्याही प्रकारचे खाणकाम करता येत नाही. प्रकल्प प्रवर्तकांना १० किमी परिघात कोणत्याही प्रकारचे नैसर्गिकख मानव निर्मित व पुरातन क्षेत्र आढळले आहे काय? हे प्रश्न विचारल्यानंतर याबाबत मुद्देसूद उत्तर मी घेणार आहे. तुम्ही हा जो सर्वे केला १० किमी च्या आतमध्ये, माझा प्रश्न असा होता की, त्या क्षेत्रामध्ये काही नैसर्गिक, मानव निर्मित व पुरातन ठिकाण आहे काय? कारण मी जेव्हा जनतेला विचारलं तेव्हा त्या क्षेत्रामध्ये पिढ्यानपिढ्या तेथे आमचं रावपाठ देवस्थान झेंडेपारपासून ३.५ किमी अंतरावर स्थित असल्याचे सांगण्यात आले. म्हणून मला विचारायचं आहे की, पुरातन काळापासून पूर्जा पाथी करण्याचं रावपाठ हे देवस्थान आहे. तथील आदिवासी नागरीकांचे ते श्रद्धास्थान आहे. हा एक मुद्दा आहे. | |
| २) | दुसरा मुद्दा आहे की त्या ठिकाणी तुम्ही जो हरीत पट्टा निर्माण करणार आहात त्यामध्ये कोण कोणत्या प्रकारची वृक्ष लागवड करणार आहात. त्याबाबतची काही सर्वेक्षण करण्यात आले आहे काय? तेथे कोणकोणत्या प्रकारची झाडे आहेत? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | तुमच्याकडे झाडांची यादी आहे काय व वृक्ष लागवड कुठे करण्यात येणार आहे? कारण आम्ही पाहिलं आहे की सुरजागढ येथे साग व इतर प्रकारची सुमारे २००-३०० वर्षे जुनी झाडे होती. ती कापल्या गेली व लाखो करोडो रूपयांची वनसंपदा ही निस्तनाबूत करण्यात आली. परंतु तेथील झाडांची कत्तल करून त्यांची विल्हेवाट कोण लावली याची माहिती आम्हाला मिळाली नाही. तसेच पर्यायी वृक्ष लागवड कुठे करण्यात आली याची माहिती देखील आम्हाला मिळाली नाही. खाण परिसरात अस्तित्वात असणाऱ्या झाडांचे सर्वेक्षण करून त्यांची पर्यायी जागेवर लागवड करण्यात यावी. त्याचप्रकारे या ठिकाणी तुम्ही जर झाड लावणार तर ती कुठं लावणार, किती लावणार व कोणत्या प्रकारचे लावणार हा माझा विशिष्ट प्रश्न आहे. | |
| ३) | त्याचप्रमाणे वाहनांची पार्कींग सार्वजनिक ठिकाणी करण्यात येऊ नये. माझा असा प्रश्न आहे की सुरजागढ मधून निघणारे जे ट्रक आहे ते रस्त्याच्या कडेला पार्क केलेली असतात व त्याचप्रमाणे इतर ठिकाणी देखील असेच होते व त्यावर कारवाई का होत नाही? कारण त्यामुळे मोठे मोठे अपघात त्या पार्कींग केलेल्या ट्रकमुळे होत आहेत. सुरजागड प्रकल्पाला याच अटी व शर्तीवर खाण पट्टा देण्यात आला आहे किंवा त्या प्रकल्पासाठी वेगळ्या अटी व शर्ती आहेत? मग जर सुरजागड मध्ये या अटी व शर्तीचे पालन होत नाही तर या ठिकाणी त्यांचे पालन होईल का? आमचे सर्व आदिवासी लोक हे जंगलावर अवलंबून आहेत. दरवर्षी आमचे लोक मोह, टोडी, डींक आणि अशा वेगवेगळ्या वन संपदेतून निर्माण होणाऱ्या उत्पादनावर आपले जीवन जगत असतात आणि आजच्या लोकसत्ता वृत्तपत्रात बातमी प्रकाशित झाली आहे की तेथील ४१ ग्रामसभांना जवळपास रू. ३० कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले आहेत. तुम्ही तुमच्या या प्रकल्पामधून आमच्या या ग्रामसभेतील लोकांना काय उत्पादन | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | देणार आहात याची माहिती देण्यात यावी. त्यानंतर परिसरातील वन्यजीवांना कोणत्याही प्रकारचा धोका उद्भवू नये अशा प्रकारची अट आहे. आपण सादरीकरणामध्ये म्हटलं आहे की तेथे वन्य प्राणी नाहीत. म्हणजे तुम्ही सर्वेक्षण केलं की तुम्ही तुमच्या मनानेच जाहीर केलं? कोणत्या आधारे आपण जाहीर केलं की तेथे कोणत्याच प्रकारचे वन्यजीव नाहीत? सर्वेक्षण कोणी केले याची माहिती द्यावी. आपण कशा प्रकारचा रोजगार देणार आहात? आणि स्थानिक नागरीकांना कशा पद्धतीने देणार आहात? उदा. तुम्हाला इंजिनियर, ITI उत्तीर्ण व इतर कुशलतेची गरज असेल तर तुम्ही त्यांना प्रशिक्षण द्यावे. जर तुम्हाला कुशल कामगारांची गरज असेल तर तुम्ही सर्वप्रथम येथील स्थानिक नागरीकांना रोजगार द्यावा व त्यानंतर त्यांना प्रशिक्षण द्यावे अथवा सर्वप्रथम प्रशिक्षण द्यावे व त्यानंतर रोजगार द्यावा. | |
| ४) | सादरीकरणामध्ये सर्व सांगण्यात आले परंतु या खाणींच्या उत्पन्नातून शासनास प्रती टन रॉयल्टी किती प्राप्त होईल याची माहिती देण्यात आली नाही. आम्हाला कळलं पाहिजे की त्या खाणी खऱ्या अर्थाने किंमत किती आहे व त्या उत्पन्नातून CSR निधीमध्ये जमा करण्यात यावा. CSR निधी प्रकल्पग्रस्त ग्रामसभांना देण्यात यावा. आजकाल CSR निधी हा सामाजिक संस्थांना देण्यात येतो व त्या निधीचा गैरवापर या सामाजिक संस्थांद्वारे करण्यात येतो. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावांचा विकास होत नाही. सदर जनसुनावणीमध्ये प्रकल्पालगतच्या गावकऱ्यांना येऊ द्यायला पाहिजे होते. पुढील जनसुनावण्यांमध्ये प्रकल्पालगतच्या गावकऱ्यांना प्रवेश देण्यात यावा याची दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी आमची अपेक्षा आहे. आमचा विकासाला विरोध नाही परंतु आदिवासींना उध्वस्त करून आणि त्या परिसरातील वनसंपदेला उध्वस्त करून जर कोणी विकास करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला आमचा विरोध आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२) **श्री. विजयकुमार शामसाहेब कोरेटी, ग्रामपंचायत नांदेळी, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सोहेळे, झेंडेपार व नांदेळी गावातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. वाहतूकीची योग्य व्यवस्था करावी. प्रकल्पग्रस्त गावात पायाभूत सुविधा पूरविण्यात यावी. या प्रकल्पामध्ये ज्यांची शेती, घर, जमीन गेलेली आहे त्यांना योग्य माबदला देण्यात यावा. झेंडेपार प्रकल्पातून निघणाऱ्या लोह खनिजाचा वापर गडचिरोली जिल्ह्यातच करण्यात आला तर चांगले होईल. प्रकल्पांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये प्रदूषणमुक्त वातावरण ठेवण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून इतर विषय उपस्थित करण्यात येऊ नयेत. तसेच बैठकीत इतर वेगळे मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. या अगोदर उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचा विचार करण्यात येऊ नये. जास्त न बोलता फक्त मुद्देसुद्द बोलावे ही विनंती. तसेच उपस्थितांना आवाहन केले की सूचना, आक्षेप नोंदविण्यापुर्वी आपले नांव व गाव सांगण्यात यावे.

३) **श्री पद्माकर सदाशिव मानकर, रा. बोडेगांव, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमच्या आदिवासी बांधवांनी जे काही वाचवून ठेवले आहे त्यासाठी आपण टपून आहोत आणि त्या अनुषंगाने आजची वाटचाल सुरू आहे. आम्हाला देखील विकास पाहिजे. परंतु विकास करत असताना आमच्या पूर्वजांनी जे काही जतन करून ठेवले आहे त्याचा उपयोग जर कंपनी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | करत असेल तर त्याचा योग्य तो मोबदला स्थानिकांना मिळाला पाहिजे. या पाचही प्रकल्पांनी जो रू. २ कोटींचा CSR निधी राखून ठेवलेला आहे त्यामध्ये आरोग्य व पर्यावरण संवर्धनाकरिता परिपूर्ण आहे काय हा महत्त्वाचा मुद्दा आहे. हा रू. २ कोटींचा खर्च अत्यंत नगण्य असल्याचे मला वाटते. यामध्ये वाढ करून उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा व शिक्षणेतर सुविधा पूरविण्यात याव्यात. तसेच या सर्व सुविधा पुरवत असताना कौशल्य विकास प्रशिक्षण देखील स्थानिकांना देण्यात यावे. तसेच रोजगारात स्थानिकांना किमान ८० टक्के प्राधान्य देण्यात यावे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे सदर प्रकल्पात १०० किलोलिटर पाण्याचा उपसा करण्यात येणार आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी खालावणार. त्याकरिता भुगर्भातील पाण्याचे नियोजन कसे करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. आमचा विकासाला विरोध नाही परंतु विकास करत असतांना स्थानिकांना डावलण्यात येऊ नये ही आमची विनंती आहे. | |

४) **<u>श्री. कृष्णा गजबे, आमदार, आरमोरी विधानसभा क्षेत्र, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित प्रकल्पातील राहणीमान, त्यांची संस्कृतीला, जल, जंगल, जमीन कंपनीने जोपासले पाहिजे. प्रकल्प क्षेत्रातील वृक्ष तोंडल्यानंतर त्याठिकाणी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लावण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व जनतेच्या म्हणण्याप्रमाणे स्थानिकांना रोजगार जास्तीत जास्त प्रमाणात प्राप्त झाला पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्प क्षेत्रालगतच्या गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, सामाजिक कल्याण, वीजपुरवठा | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | इत्यादी प्रकारच्या आवश्यक त्या पायाभूत सुविधा पूरविण्यात याव्यात. | |
| ४) | तसेच स्थानिकांना विश्वासात घेऊन प्रकल्प कार्यान्वित करावा. या परिसरातील नागरीकांचे जीवनमान वन उत्पादनावर अवलंबून आहे आणि काही प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे जर प्रकल्पात भू-संपादन होत असल्यास त्याचा योग्य तो मोबदला स्थानिकांना तात्काळ देण्यात यावा. तसेच शासकीय योजनांचा स्थानिकांना लाभ मिळवून देऊन त्यांचे जीवनमान ऊंचावणार. परंतु त्या ठिकाणची स्थानिक संस्कृती, मंदीर, पिण्याचे पाणी दूषित होणार नाही याची खबरदारी प्रकल्प प्रवर्तकांनी घ्यावी. आरोग्याची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. ज्यांची जमीन, घरे या प्रकल्पामध्ये संपादित होणार आहे अशा लाभार्थ्यांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे जेणेकरून त्यांचे जीवनमान ऊंचावणार. विकासाच्या माध्यमातून या प्रकल्पाद्वारे एक चांगली संकल्पना येथे आणण्यात आली आहे. या जनसुनावणीला सर्वांचा विरोध नाही. परंतु स्थानिक नागरीकांना योग्य त्या पायाभूत सुविधा देण्यात याव्यात ही आग्रहाची सूचना आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

५) **<u>श्रीमती अमिता मडावी, ग्रामपंचायत झेंडेपार, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आदविासी सुरक्षित तर जंगल सुरक्षित, जंगल सुरक्षित तर पर्यावरण सुरक्षित आणि पर्यावरण सुरक्षित तर पूर्ण जग सुरक्षित हे आमच्या ग्रामसभेचे बोधवाक्य आहे. प्रदूषण विभागाने सर्वे केला परंतु गावातील स्थानिक नागरीकांना विचारून केले काय? पर्यावरण विभाग फक्त डोंगराचा भाग छायाचित्रात दाखवत आहेत. आम्ही ग्रामसभेमार्फत फिरतो तेथे डोंगराला | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | |
|---|---|
| | लागून झाडं आहेत. तेथील हजारो झाडांचे सर्वेक्षण करताना ग्रामसभेला विचारले काय? आम्ही पर्यावरण विभागास ग्रामसभेमार्फत आक्षेप दिलेला त्याचा पर्यावरण विभागाने विचार करावा. | |

६) **<u>श्री सिद्धार्थ रामचंद्र राऊत, ग्रामपंचायत मसेली, ता. कोरची, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प स्थळावर आयोजित करायला पाहिजे होती जेणेकरून प्रकल्पग्रस्त किंवा संबंधित गावातील वयोवृद्ध नागरीक जनसुनावणीकरिता हजर राहू शकले असते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | सादरीकरणामध्ये प्रदूषण निर्देशांक वाढणार असल्याचे निश्चितपणे दाखविण्यात आले. जर या परिसरामध्ये प्रदूषण वाढणार असेल आणि त्यामुळे सामान्य नागरीकांवर त्याचा विपरीत परिणाम होत असले किंवा झाला तर त्याचा मोबदला कंपनी नागरीकांना कशा स्वरूपात देणार? कारण एकदा प्रकल्प कार्यान्वित झाला की प्रकल्प प्रवर्तक सर्व विसरून जातात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे या प्रकल्पात सुमारे १४९ लोकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. प्रकल्प कार्यान्वित करण्याआधी या क्षेत्रातील विद्यार्थ्यांकरिता आपल्या प्रकल्पाशी निगडीत असलेले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमात ट्रेडस् उपलब्ध करून द्यावे. तसेच स्थानिक युवकांना रोजगारात सामावण्याची हमी देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | या परिसरात आदिवासी नागरीक खूप वर्षांपासून वसलेले आहेत. या क्षेत्रातील बहुतांश लोकांना त्या शेतजमीनीचे पट्टे मिळालेले नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे या क्षेत्रातील जवळपास ८० टक्के | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नागरीकांकडे त्यांचे घराच्या जागेचा ७/१२ किंवा नमुना ८अ नाहीत. जर अशा लोकांचे खाणीमध्ये संपादित करण्यात आले तर त्यांना त्याचा मोबदला मिळणार नाही कारण त्यांच्याकडे त्या संबंधित कागदपत्र उपलब्ध नसतील. अशा नागरीकांना मोबदला कसा देण्यात येईल याबाबत आपण सर्वांनी विचार करावा. | |

७) **<u>श्री. सुरेश काटींगे, ग्रामपंचायत सदस्य, वेदकाठी, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | झाडांची कत्तल करण्यात येईल तर त्याची भरपाई कशी करण्यात येईल. पाण्याची पातळी खालावल्यामुळ स्थानिक नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची समस्या उद्भवू नये याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात येईल. खाणीमध्ये उत्खनन पद्धती कशी असणार आहे ब्लास्टींग तर नाही होणार? स्थानिक महिला बचत गट, पुरूष बचत गट व इतर नागरीकांना काही छोटे-मोठे उद्योग उभारण्यास मदत करणार आहात काय? स्थानिक सामाजिक संस्थांना वनांचे संरक्षण करण्याकरिता आपण मदत देणार काय? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

८) **<u>डॉ. श्री. देवराव होळी, आमदार, चिमूर-गडचिरोली विधानसभा क्षेत्र, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज गडचिरोली जिल्ह्याच्या कोरची तालुक्यातील ५ लोह खनिज उत्खनन प्रकल्पांची जनसुनावणी होत आहे. त्याकरिता येथे सर्व उपस्थित आहेत. आपल्याला माहिती आहे की कोनसरी येथे स्पाँज आयर्न प्लांट होत आहे. पाचही खाण मिळून एक उद्योग होणार आहे की | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | फक्त उत्खनन होणार आहे. पाचही उद्योगांमध्ये कोरची तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे. त्या ठिकाणी गडचिरोली जिल्ह्यातील सर्व आमदार व खासदारंचा या प्रकल्पांना विरोध नसेल. माझी पाचही प्रकल्पधारकांना विनंती आहे की त्यांनी लोकसहभाग करून होणारा विरोध टाळण्याचा प्रयत्न करावा. स्थानिकांचा या प्रकल्पांना काही प्रमाणात विरोध असणारच आहे. परंतु स्थानिकांचा सहभाग घेऊन त्यांनी स्थानिकांना या प्रकल्पात रोजगार द्यावा. स्थानिकांचा विकासाला विरोध नाही परंतु विकास करताना या क्षेत्रातील आदिवासी समाजाच्या पुरातन देवस्थानाचे जतन प्रकल्प धारकांनी केले पाहिजे. त्यांना त्या ठिकाणी पूजा करण्याची परवानगी दिली पाहिजे. प्रकल्प सुरू करताना पर्यावरणाचा ऱ्हास होईल त्याकरिता स्थानिकांचा सहभाग खनिजाचा गडचिरोली जिल्ह्यातच चांगल्यात चांगला प्रकल्प ऊभा कसा करता येईल याची काळजी घेतली पाहिजे. माझी अशी देखील विनंती आहे की, लोह खनिज उत्खननासोबतच लोह खनिज प्रक्रिया प्रकल्प देखील कोरची तालुक्यातच झाला पाहिजे. | |

९) **<u>श्री आनंदराव चौबे, राहणार कोरची, ता. कोरची, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या जनसुनावणीमधून कोणतातरी ठोस निर्णय व्हायला पाहिजे. कारण हा प्रकल्प सन २०१७ पासून लांबलेला आहे. या प्रकल्पांमुळे आमच्या तालुक्यातील बेरोजगारीचे प्रमाण नष्ट होण्यास मदत होईल. आमच्या आदिवासी देवस्थानाचा विकास झाला पाहिजे. त्याची सर्वस्वी जबाबदारी कंपनीची असायला पाहिजे. खाणकामामुळे पसिरात कमीतकमी प्रदूषण कसे होईल याबाबत | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीने निर्णय घ्यावा. या प्रकल्पामध्ये एकही कागदपत्र नसलेल्या लोकांची जमीन, शेती किंवा घरे जाणार आहेत अशा लोकांना पाच पटीने शासकीय नियमानूसार मोबदला मिळायला पाहिजे. वाहतूकीची नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्था करावी. खाण परिसर ते छत्तीसगढ राज्याच्या सीमेपर्यंत खनिज वाहतूकीसाठी काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात यावे. | |

१०) **श्री रूपेश दिनेश्वर गणवीर, ग्रामपंचायत वेदकाठी, ता. कोरची, जि. गडचिरोली:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझा प्रकल्पाच्या जनसुनावणीस विरोध नाही परंतु आमच्या काही अटी व शर्ती आहेत. आमच्या आदिवासी लोकांचे नूकसान करून प्रकल्प सुरू होत असेल तर आम्हाला हा प्रकल्प नको. जर प्रकल्प सुरू होत असेल तर स्थानिकांना प्रकल्पामध्ये रोजगार मिळाला पाहिजे. तसेच आमच्या तालुक्यातील युवकांची उच्च शिक्षणाची जबाबदारी कंपनीने घेतली पाहिजे. तसेच खनिज वाहतूकीसाठी लागणारे वाहन घेण्याची ताकद आमच्यात नाही. त्याकरिता देखील कंपनीनेच सहकार्य करावे व वाहनधारकांना खनिज वाहतूक करण्यास प्रोत्साहीत करावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

११) **श्री विरेंद्र सुखदेव आदे, ग्रामपंचायत वेदकाठी, ता. कोरची, जि. गडचिरोली:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| २) | आमचं या पाचही खाण प्रकल्पांना समर्थन आहे. परंतु काही अटी व शर्ती आहेत. आमच्या कोरची तालुक्यात बेरोजगारीचे प्रमाण खूप आहे. येथील युवक रोजगारासाठी बँगलोर, मुंबई व इतर ठिकाणी नौकरीकरिता जातात. त्यामुळे स्थानिक | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे जेणेकरून तालुकास्तरावर रोजगर मिळेल व स्थानिक युवक रोजगारासाठी बाहेर जाणार नाहीत. गडचिरोली जिल्ह्याची कोणताही उद्योग नसलेला जिल्हा असल्याची ओळख आहे. ती ओळख जर या खाण प्रकल्पांमुळे बदलत असले तर आमचा या पाचही प्रकल्पांना समर्थन आहे. खाणकामामुळे प्रदूषणात वाढ होणारच आहे. परंतु प्रदूषणामुळे नागरीकांना होणाऱ्या विकार व आजारावर कोरची तालुक्यातच उपचार व्हावा याची काळजी कंपन्यांनी घ्यावी. या प्रकल्पांमुळे कोरची तालुक्यातील नागरीकांचे जीवनमान ऊंचावणार व बेरोजगारीची समस्या दूर होईल. | |

१२) **श्री. युनूस शेख, ता. जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे २-३ महत्त्वाचे मुद्दे आहेत. सर्व मुद्यांवर येथील लोकप्रतिनिधी बोलले आहेतच. या प्रकल्पांमुळे कोरची तालुक्यातील बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल. परंतु प्रस्तावित पाचही प्रकल्पांचे प्रकल्प प्रवर्तक हे गडचिरोली जिल्ह्याचे नाहीत. त्यामुळे त्यांचा स्थानिक जनतेच्या भावनांशी काही संबंध आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की ज्या खाणधारकांना खाण पट्ट्याचे वाटप करताना त्यांच्याकडून शपथपत्र लिहून घेण्यात यावे की त्यांनी संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात रोजागाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या. कारण प्रकल्प प्रवर्तक ज्या रोजगाराच्या मागण्या जनसुनावणी दरम्यान मान्य करतात त्या कधीच पूर्ण होत नाहीत. प्रकल्प प्रवर्तकांकडून लिखीत स्वरूपात आश्वासन द्यावे की जो पर्यंत गडचिरोली जिल्ह्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही तोपर्यंत शासनाने आम्हाला खाणपट्टा देऊ नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था फार खराब आहे. जिल्ह्यामध्ये नवनविन उद्योग आले पाहिजे व रोजगाराच्या नव-नविन संधी उपलब्ध झाली पाहिजे ही प्रत्येकाची मनोकामना आहे. त्या ठिकाणच्या आदिवासी बांधवांचा विकास करण्याचा विचार करण्यात यावा. आज ग्रामपंचायतींना बांबू उत्पादन करण्याचा अधिकार आहे परंतु ग्रामपंचायतींना खाणकाम करण्याचा अधिकार का नाही? तो ही अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात यावा. त्यामुळे खाणकामातून निघणाऱ्या उत्पन्नातून परिसरातील सामान्य नागरीक व आदिवासी बांधवांचा विकास करता येईल. जंगलातून होणाऱ्या उत्पन्नाला निस्तार दर लागू करण्यात यावा. त्यामध्ये जंगलातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग हा स्थानिकांना त्यांचा विकास करण्याकरिता आरक्षित करण्यात यावा. जेणेकरून स्थानिक नागरीक एकत्र येऊन एखादा कारखाना निर्माण करतील व त्याचा फायदा स्थानिक नागरीकांना होईल. | |

१३) **श्री नकुल प्रल्हाद सहारे, बेदकठी व सोहळे, तालुका कोरची, जिल्हा-गडचिरोली:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी जनसुनावणीसाठी ग्रामीण भागातून येथे जनता उपस्थित आहे. मावा नाटे मावा राज म्हणजेच माझं गांव माझे राज्य असे असले तरी आदिवासी समाजाची संस्कृती जल, जंगल, जमीन दिलेले आहे. त्या ठिकाणी खाजगी खाण प्रकल्प असण्याची गरज नाही. त्या ठिकाणी शासकीय खाण प्रकल्प यायला पाहिजे. शासनाने तेथे उत्खनन केले पाहिजे. या जनसुनावणीकरिता लोक फार अंतरावरून येत आहेत आणि फार आतुरतेने पाहत आहेत. जनसुनावणीदरम्यान लोकांच्या विचारांचे आदान प्रदान असले पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सदर जनसुनावणी प्रकल्प स्थळी आयोजित करायला पाहिजे होती. ग्रामसभा ही शासकीय यंत्रणेखाली कार्य करत असते व ग्रामसभांना जल, जंगल, जमीनीची हक्क देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे ज्या ग्रामसभांना वन हक्काचा पट्टा देण्यात आला आहे त्या ग्रामसभांना उत्खननाचा हक्क देखील देण्यात यावा. शासनाने त्यावर नियंत्रण ठेवावे. शासनाचे नियंत्रण असल्यास परिसरातील कोणत्याही गोरगरीबावर अन्याय होणार नाही. खाजगीकरण झाल्यास आपल्याला गेटकीपर, मजूर, दिवाणजी, सुपरवायजर या व्यतिरिक्त आपल्याला रोजगाराच्या संधी मिळणार नाहीत. खाजगी कंपन्यांकडे मोठ्या कामासाठी मोठ्या पदावर बाहेरची माणसं असतात. या खाजगीकरणाला आळा घालण्यासाठी कोरची तालुक्यात येणाऱ्या पाचही कंपन्यांना माझे असे सांगणे आहे की आपल्या उत्खननामुळे कोणत्याही गोरगरीबाचे नूकसान होणार नाही याकरिता कंपन्यांनी प्रत्येक कामगाराचा किमान १५ लाख रूपयांचा विमा काढावा. सुरजागड येथे होणाऱ्या अपघातांचा मोबदला म्हणून फक्त २.५ लाख रूपये देण्यात येतात. तसे या प्रकल्पांमध्ये होता कामा नये. जर शासकीय यंत्रणा असेल तर त्याठिकाणी कमीतकमी १५ लाख रूपये विम्याची रक्कम द्यायला पाहिजे. येथे उपस्थित नागरीकांचे मत काय? शासकीय यंत्रणा पाहिजे की खाजगी यंत्रणा पाहिजे? जर शासकीय यंत्रणा असेल तर पर्यावरणाचा जास्त ऱ्हास होत नाही. कंपनी आमच्याकडे एक तर गरीब जनता किंवा नक्षली या नजरेने पाहतात. त्यामुळे आम्ही कोणत्या दिशेने पाऊल टाकावे हे कळत नाही. आम्हाला आमचे जीवन कसे हवे याबाबत विचार करायची गरज आहे. आम्हाला आमचे जीवन सामाजिक पाहिजे. माझे गाव, माझा देश आणि मी या मताने स्थानिक लोकांनी त्यांचे जीवन जगणे आवश्यक | |

| | | |
|---|---|---|
| | आहे. तेव्हाच आपल्याला शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. आमच्या लोकांची पिढ्यानपिढ्या असलेली जमीन त्यांची संपत्ती आहे. आदिवासी लोकांच्या देवस्थानाचे विकास केले पाहिजे. | |

१४) **श्री. दिपक लखन नायक, कोरची, ता. कोरची, जिल्हा गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. येथील उच्च शिक्षीत युवक शिक्षण पूर्ण केल्यानंतर चंद्रपूर, नागपूर, पुणे, मुंबई व बँगलोर इत्यादी मोठ-मोठ्या शहरात नौकरी करण्यासाठी जातात. चामोर्शी तालुक्यात लोह प्रकल्प आल्यामुळे येथील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे व त्यांचा उदर्निवाहाचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे. खाणकाम सुरू झाल्यावर खाणीतून भू-गर्भातील पाणी निघणार. सर्वप्रथम प्रकल्प प्रवर्तकांनी त्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करावे. तसेच वृक्षतोड केल्यानंतर त्याच्या १० पटीने वृक्ष लागवड करण्यात यावी व त्याचे किमान ५ वर्ष संगोपन करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

१५) **एक नागरीक, ता. जि. गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जनसुनावणी आयोजित एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी होती की सदर क्षेत्र अनुसुची ५ मध्ये आहे. अनुसूची ५ अंतर्गत क्षेत्रामध्ये ग्रामसभेची परवानगी न घेता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करता येत नाही. या जनसुनावणीसाठी एकही ग्रामपंचायतीची परवानगी घेतली आहे काय याची माहिती देण्यात यावी. त्यामुळे ही जनसुनावणी | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | अवैध असल्यामुळे ती मान्य करता येत नाही. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करून ग्रामसभांची परवानगी घेऊनच प्रकल्प बाधित क्षेत्रामध्ये परत घेण्यात यावी. कंपनी अजून कार्यान्वित झालीच नाही त्यामुळे कंपनीने का रोजगार द्यावा, रस्ते द्यावे, सोई सुविधा द्याव्या. आमचं शासन असमर्थ आहे का? जर शासन समर्थ असेल तर आपण ही जनसुनावणीमध्ये का आलेलो आहे? सदर जनसुनावणी याच ठिकाणी रद्द करण्यात यावी. | |

उपस्थित नागरीकांना जनसुनावणी दरम्यान शांतता राखण्याचे आवाहन केले. त्यांनी पुढे सांगितले की, जनसुनावणीदरम्यान धुमाकूळ घालून कोणाचेही बोलणे स्पष्टपणे ऐकता येणार नाही. ज्यांना मत मांडायची आहेत त्यांनी मंचावर येऊन त्यांची मते मांडावीत. धुमाकूळ घालून कोणचेही म्हणणे स्पष्टपणे ऐकता येणार नाही व त्याची नोंदही घेता येणार नाही. जनसुनावणीची व्हिडीओ रेकॉर्डींग देखील करण्यात येत आहे त्यामुळे दिशाभूल करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. ज्यांना मत मांडावयाची आहेत त्यांचे येथे मी स्वागत करतो. कृपया जनसुनावणीदरम्यान गोंधळ घालून नये.

**१६) <u>सौ. चंद्रकला कल्लो, झेंडेपार, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | झेंडेपार येथे ५ लोह खनिज उत्खनन प्रकल्प येत आहेत. या ठिकाणी झेंडेपार गावातील वृद्ध व्यक्ति बाहेर जनसुनावणीसाठी उपस्थित आहेत. माझी विनंती आहे की, त्यांना आत येण्याची परवानगी देण्यात यावी व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**१७) <u>श्री. नरेश साहाय, पत्रकार, ता. कोरची, जिल्हा गडचिरोली:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गडचिरोली जिलह्यातील कोरची तालुका हा शेवटच्या टोकावर स्थित असून छत्तीसगड राज्याच्या सीमालगत आहे. कोरची तालुक्यातील प्रस्तावित खाणींचा प्रस्ताव हा एकतर्फी घेतल्या | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जात आहे. पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांना अधिकार देण्यात आलेला असून त्या ग्रामसभेचा वापर का नाही केल्या जात? ग्रामसभेचे उल्लंघन का केल्या जाते? पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांना जल, जंगल, जमीन या गोष्टींवर अधिकार दिलेला आहे. अशा सुनावणीच्या वेळेस विरोध करणाऱ्या नागरीकांना देखील येथे येऊ द्यायला पाहिजे. मी येथे मा. जिल्हाधिकारी यांना सांगू ईच्छितो की कालपासून कोरची तालुक्यातील नागरीक येथे उपस्थित असून ते उपाशी आहेत. माझा प्रश्न असा आहे की, कोरची तालुक्यात प्रस्तावित असलेल्या ५ खाणींचा प्रस्ताव कोणत्या आधारे घेण्यात आलेला आहे. ४६.३७ हे.आर ची जी जमीन आहे तेथे दाट वन असताना तेथे फक्त १५४ झाडे कशी दाखविण्यात आली. मा. महोदयांना विनंती आहे की त्यांनी माझ्यासोबत कोरची तालुक्याचा दौरा करावा. त्यांनी मी दाट वन कसे असते ते दाखवतो. तेथे जंगल आढळले नसल्यास आत्ताच्या आता खाणकाम करण्यासाठी सहमती मी देतो. सदर प्रकल्पास काही नागरीकांचा विरोध देखील आहे. ज्या लोकांचा विरोध आहे त्यांचं ऐकलं का जात नाही? स्थानिक नागरीकांना आत प्रवेश का दिला जात नाही? त्यांना प्रवेश देऊन त्यांचे म्हणणे ऐकायला पाहिजे. माझं एकच म्हणणे आहे की, सदर जनसुनावणी ही प्रकल्प स्थळी घेण्यात यावी व स्थानिक लोकांची या प्रकल्पाबाबतची प्रतिक्रिया घेण्यात यावी. लोकांची प्रतिक्रिया खाणीच्या बाजूने नसेल तर या खाणींना उत्खनन करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. सुरजागड लोह खनिज उत्खनन प्रकल्पाच्या वाहतूकीमुळे अहेरी ते आलापल्ली या रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. रस्ते बांधण्यासाठी जितका खर्च येत आहे त्यापेक्षा जास्त खर्च अहेरी ते आलापल्ली या रस्त्याची दुरूस्ती करण्यात येत आहे. आपणांस परत विनंती आहे की, प्रकल्प स्थळीच | |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणी घेण्यात यावी अन्यथा खाणपट्टाच रद्द करण्यात यावा. | |

१८) **श्री. आदेश गोपीचंद राऊत, राहणार-मसेली, ता. कोरची, जिल्हा-गडचिरोली:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणकामामुळे प्रदूषण होणार आहे. या प्रदूषणाचा सरसकट परिणाम मानवाच्या आरोग्यावर होणार आहे. सदर खाण प्रकल्पापासून १ किमी, १.५किमी, २ किमी., २.५ किमी., अंतरावर स्थित आहेत. महोदय आपणांस सांगू इच्छितो की, खाण परिसरालगतच्या नागरीकांच्या आयुर्मानावर याचा विपरीत परिणाम होईल. प्रदूषणामुळे येणाऱ्या पिढीवर देखील परिणाम होईल. प्रदूषणाचा परिणाम प्रकल्पापासून २० किमी अंतरावर स्थित लोकवस्तीवर होणार नाही. प्रदूषणामुळे शेतपिकांचे देखील नूकसान होईल. या प्रकल्पामुळे आमचे नूकसान होत असेल तर तो रद्द करण्यात यावा. प्रकल्पक्षेत्रालगतचे गांव जसे पर्यावरण अनुकूल आहेत तसेच ठेवायला पाहिजे. सादरीकरणामध्ये सांगण्यात आले की, सदर परिसरात झाडे नाहीत. परंतु प्रकल्प प्रवर्तकाने फक्त खडकाचे छायाचित्र सादरीकरणात दाखवून स्थानिक नागरीक व शासनाची दिशाभूल केलेली आहे. सदर परिसरात भरपूर प्रमाणात झाडे आहेत. तुम्हा Google Maps द्वारे याची पडताळणी करू शकता. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१९) **श्री. उमाशंकर भ. भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर:-**

MMRDA कायदा, २०१५ RC Schedule-१ अधिसूचना १९६० नूसार लोह खनिज हे major mineral मध्ये येते. पेसा minor mineral साठी आहे.

मा. जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांच्या आदेशाप्रमाणे सादरीकरण परत दाखविण्यात आले. त्यामध्ये दिलेल्या ७/१२ मध्ये प्रस्तावित सर्व्हे नंबर असल्याचे दाखविण्यात आले. मा.

जिल्हाधिकारी यांनी MMRDA कायद्याबाबत विस्तृत माहिती दिली. त्यानूसार सदर जागा औद्योगिक कार्यासाठी आरक्षित केलेली आहे.

मा. माजी आमदार श्री. उसेंडी यांनी विचारले की, सदर जमीन Schedule क्षेत्रामध्ये आहे की नाही?

मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी सांगितले की, Chapter ६ मध्ये खाण व खनिजांबाबत विस्तृत माहिती दिलेली आहे. पेसाच्या कार्यक्षेत्रात येत नाही व त्यामुळ त्याबाबत विचारणा करण्यात तथ्य नाही. प्रश्न विचारण्यापूर्वी त्यामागे तथ्य काय आहे हे पाहावे. पेसा मध्ये मार्गदर्शक तत्त्व काय आहेत ते पाहावे. पेसा कायद्याचे मार्गदर्शक तत्त्वे सन २०१५ नंतर तयार करण्यात आले. त्यामुळे आपले जे म्हणणे आहे ते येथे अंमलात नाहीत.

२०) एक नागरीक, ता. जि. गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अनुसूची ५ अंतर्गत क्षेत्रामध्ये ग्रामसभेची परवानगी न घेता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करता येत नाही. या जनसुनावणीसाठी एकही ग्रामपंचायतीची परवानगी घेतली आहे काय याची माहिती देण्यात यावी. त्यामुळे ही जनसुनावणी अवैध असल्यामुळे ती मान्य करता येत नाही. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करून ग्रामसभांची परवानगी घेऊनच प्रकल्प बाधित क्षेत्रामध्ये परत घेण्यात यावी. | |

२१) डॉ. नामदेव क्षीरसागर, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी, गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. उसेंडी साहेबांनी ज्या न्यायालयीन प्रकरणाची माहिती दिली त्यानूसार पेसा कायद्यामध्ये ग्रामसभेस वनउत्पादन व Minor minerals वर अधिकार आहे. आदिवासींचा minor minerals वर अधिकार आहे. त्यामुळे त्या क्षेत्रात कोणताही प्रकल्प येण्यापूर्वी तेथील ग्रामसभेची परवानगी घेणे आवश्यक आहे. पेसा सर्व तालुक्यांसाठी लागू आहे. जिल्हाधिकारी हे लीज देऊ शकतात | |

| | | |
|---|---|---|
| | व रॉयल्टी घेऊ शकतात. आष्टी ते आलापल्ली या रस्त्याची अवस्था फार खराब आहे. रस्त्यांची अवस्था खूप खराब असल्यामुळे वडसा मार्गे जावे लागते. विकासकाम समाजाला घातक नसावे. खाणींपासून प्रक्रिया केंद्र खूप लांब आहे. म्हणून प्रक्रिया करणारे उद्योग खाणींपासून जवळ उभारले गेले पाहिजे. उदा. बेलाटीला खाणीला पहाडावर अनेक ठिकाणी खोदकाम केले आहे परंतु रस्त्यांची अवस्था फार चांगली आहे. इथून काढलेले उत्पादन लांब दूसरीकडे नेऊन प्रक्रिया करणार व तिकडे विकास होणार. इथल्या लोकांना मात्र धूळ खावी लागणार असे होता कामा नये. | |

२२) **श्री. अशोक नेते, खासदार, गडचिरोली:-**

या परिसराचा खासदार म्हणून मी सर्वांचे स्वागत करतो. खूप लोकांनी त्यांची मते मांडलीत जे योग्य आहे. ज्यांच्या जमीनी गेल्या आहेत त्यांना प्रकल्प प्रवर्तकांनी दहा पटीने मोबदला द्यावा. एक वृक्ष तोडल्यास त्या बदल्यात १० वृक्ष लावण्यात यावी. वडसा गडचिरोली रेल्वे प्रकल्पास रू. ९०० कोटी राज्य सरकारद्वारा देण्यात येतील. १९९६ मध्ये पेसा कायदा लागू झाला व या कायद्यानूसार स्थानिक लोकांचा अधिकार खनिजावर आहे. सन २०१४ रोजी वन हक्क कायदा पारित झाला ज्यामध्ये जमीन भाडे तत्त्वावर दिली जाऊ शकते. योग्य विकास व्हावा याकरिता लोह खनिज प्रक्रिया प्रकल्प खाणीजवळ असणे गरजेचे आहे. या प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले जावे व सुविधा देण्यात याव्या. गडचिरोली जिल्ह्यात ७८ टक्के वन क्षेत्र आहे व हा आदिवासी जिल्हा आहे. रू. १४५०० कोटींच्या विकास कामांबद्दल त्यांनी अवगत केले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या वतीने पर्यावरण सल्लागाराने खालीलप्रमाणे उत्तरे दिली:-

सर्वेक्षणादरम्यान नैसर्गिक व मानव निर्मित, ऐतिहासिक वास्तु १० कि.मी. परिघात नव्हती, रावपाठ धार्मिक क्षेत्राचा विकास केला जाईल, रस्त्यच्या कडेला व रिकाम्या जागेत वृक्ष लागवड करण्यात येईल. तसेच प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात कुठलाही दुर्मिळ प्राणी आढळला नाही. प्रस्तावित प्रकल्पासाठी कुठल्याही प्रक्रियेकरिता भूगर्भातील पाण्याचा वापर केला जाणार नाही. फक्त घरगुती वापरासाठी पिण्याचे पाणी टँकरद्वारे आणल्या जाईल. शिवाय Rain Water Harvesting Pit, Mine Pit आणि Garland drain मध्ये पावसाळ्यात जमा झालेल्या पाण्याचा वापर धूळ नियंत्रण आणि हरीत पट्टा विकासासाठी करण्यात येईल. सार्वजनिक ठिकाणी वाहने उभी केली जाणार नाहीत. ट्रकची पार्कींगदेखील रस्त्यावर केला जाणार नाही. वन उत्पादनाच्या उद्योगास वाढ मिळण्यास मदत करण्यात येईल. EIA/EMP साठी सर्वेक्षणाचे काम नोंदणीकृत संस्थेस देण्यात आले होते,

स्थानिकांना नौकरीकरिता प्रशिक्षण देण्यात येईल, शक्यतो प्रभावित परिवारापैकी एकास नौकरी देण्यात येईल. रहदारीची सुविधा, पायाभूत सुविधा, जमीनीचा मोबदला इत्यादीबाबींवर भर दिला जाईल. योग्य मोबदला देण्यात येईल. उद्योगाने रू. २.० कोटींची व्यवस्था केलेली आहे ज्यामध्ये आरोग्य सुविधा, प्रशिक्षण सुविधा व शैक्षणिक सुविधेवर भर दिला जाईल. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले जाईल. भूमीहीनांना योग्य मोबदला व नौकरी दिली जाईल. ज्यांचे ७/१२ नाहीत त्यांच्या कागदपत्रांची पुन्हा तपासणी करण्यात येईल. खाणीजवळ प्रक्रिया उद्योग उभारण्याचे सद्य:स्थितीत प्रस्तावित नाही. बेरोजगारीला समूळ नष्ट करण्याकरिता प्रयत्न केले जातील. प्रदूषण नियंत्रणाकरिता controlled blasting, पक्के रस्ते, पाणी फवारणी यंत्रणा, मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड, इत्यादी उपाययोजना केल्या जातील. प्रभावित गावांच्या विकासाकरिता उपाययोजना केल्या जातील. एक झाड तोडल्यास त्या बदल्यात १० झाडे लावण्यात येतील. सन २०१७ ते २०२२ दरम्यान तीव्र नक्षली कारवायांमुळे प्रकल्प प्रवर्तकांतर्फे जनसुनावणी करिता अर्ज केला गेला नाही व त्यामुळे जनसुनावणी आता सन २०२३ मध्ये होत आहे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, प्रकल्पबाधित गावातील सर्व लोकप्रतिनिधी – सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक, प्रकल्पाचे अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अधिकारी व कर्मचारी, पत्रकार या सर्वांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

जनसुनावणी दरम्यान ऑनलाईन पद्धतीने कोणीही उपस्थित नव्हते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेले १४२ निवेदने सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(तानाजी यादव)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(धनाजी पाटील)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली. |